


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

dainiklokaarambh@gmail.com

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २१ डिसेंबर २०२४ | अंक१२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# बीडमधील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढणार, दोर्षीवर मकोका अंतर्गत कारवाई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## बीड घटनेची न्यायालयीन, एसआयटीमार्फत दुहेरी चौकशी, पोलीस अधिक्षकांची बदली परभणीतील घटनेची न्यायालयीन चौकशी होणार ;पोलीस अधिकारी निलंबित

## बीड, परभणीतील मृतांच्या कुटुंबियांना दहा लाखांची मदत

**नागपूर,/प्रतिनिधी**

नागपूर, दि. २०:–बीड, परभणी मधील घटना दुर्दैवी आहेत. या दोन्ही घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली असून बीड जिल्ह्यातील हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी केली जाईल. तर परभणी मधील संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. बीड, परभणी घटनांमधील दोन्ही मृतांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्यानुसार बीड मध्ये हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख आणि परभणी मधील घटनाक्रमात मृत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ही दहा लाखांची मदत देण्यात येणार आहे. बीड मधील प्रकरणाची न्यायालयीन व एसआयटी मार्फत चौकशी करण्याबरोबर जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोर्षीवर मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यांतील भूमाफिया, वाळूमाफियांस गुन्हेगारीची पाळेमुळे खणू काढू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विधानसभेत मांडली. परभणीत पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी वाजवी पेक्षा अधिक पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. बीड, परभणी येथील घटनेसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथील कृत्य एका मनोरूग्णाने केले आहे. तो मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात कोंबिंग ऑपरेशन झाले नाही. परंतु पोलीसांनी वाजवीपेक्षा जास्त बळाचा वापर केला आहे काय याची चौकशी केली जाईल. ही चौकशी पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून करण्यात येईल. परभणीत सकल हिंदू समाजाचा मोर्चा हा सर्वपक्षीय होता. या मोर्चात बांग्लादेशमधील हिंदूंसंदर्भात मागणी करण्यात आली होती. त्यामुळे ही हिंदू विरूद्ध दलित अशी दंगल नाही. परभणीत झालेल्या तोडफोडीत दुकान, वाहन, सरकारी कार्यालयांचे नुकसान झाले आहे असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीड येथील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मोहीम हाती घेणार असून चौकशीत दोषी आढळणा–यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. बीडमध्ये आवाडा ग्रीन एनर्जी कंपनीने गुंतवणूक केली आहे. या कंपनीची कामे आम्हालाच द्या किंवा खंडणी द्या अशी मानसिकता काहींची तयार झाली आहे. त्यामुळे बीड प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणात प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहभाग असणा–्यांवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल. बीड जिल्ह्यातील पोलीसांनी देखील योग्य कारवाई करावी. गुन्हे दाखल करताना वस्तुस्थिती तपासावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



# लक्ष्मण आण्णांनी विधानसभा निवडणुकीत संजयनगर वासियांना दिलेला शब्द पाळला

## संजयनगर येथील रहिवाशांकडून लक्ष्मण आण्णांनचे मानले

शहरातील संजयनगर येथे काही भागात लाईटच्या पोलची आवश्यकता होती संजयनगर येथील भिल्ल वस्तीच्या बाजुला असलेल्या भागात पोल नसल्याने त्या नागरिकांना खुप मोठ्या अंतरावरुन लाईट घ्यावी लागत असे त्यामुळे नागरिकांची गेल्या काही वर्षांपासून गैरसोय होत असे तेथील नागरिक पोल मिळावे म्हणून सातत्याने मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे पाठपुरावा करीत होते जनेतेच्या मागणीची दखल घेत मा.आ.लक्ष्मण आण्णांनी विज वितरण कार्यालयाकडे पाठपुरावा करुन संजयनगर येथील विद्युत पोलचा प्रश्न मार्गी लावा अशा सुचना केली होत



# विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील लोकांसाठी विविध योजना

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील लोकांसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) व रामोशी समाजासाठी उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) या दोन महामंडळाची स्थापना केलेली आहे. ही महामंडळे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. अंतर्गत कार्यरत असुन त्यांना स्वतंत्र उद्दीष्ट देण्यात आलेले आहे.

या तिन्ही महामंडळांअंतर्गत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, रुपये एक लाख थेट कर्ज योजना, बीज भांडवल योजना राबविल्या जात आहेत. जिल्ह्यायातील इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी महामंडळाच्या *www.vjnt.in* या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय वसंतराव नाईक वि.जा.भ.ज. विकास महामंडळ ( मर्या.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नांदेड. फोन क्र. ०२४६२–२२०२४४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर. एस. नरवडे यांनी केले आहे.

## रेल्वे पुलाच्या कामासाठी वळण रस्ता 20 दिवस बंद पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन

*बीड, दि. 20 :- बीड शहरानजिक रेल्वे पूलाचे काम सुरु असल्याने मार्गालगत असणारा वळण रस्ता बंद करण्यात येणार असून वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.*

*सध्या कपिल मुनी मंदिर पासून ज्या मार्गाने बीड रोड ओलांडून वाहने सध्याच्या वळण रस्त्याने जातात त्या रेल्वेमार्गालगतच्या वळण रस्त्यावर वाहतूक पुढील 15 ते 20 दिवस बंद राहणार आहे, असे रेल्वेतर्फे जारी एका प्रसिध्दीपत्रात म्हटले आहे.*



*पिठी नगरीमध्ये मनोज जरांगे पाटलांचे स्वागत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले यावेळी समस्त गावकरी उपस्थित होती*

## जोमेगाव येथे संत गाडगे बाबा यांना अभिवादन

*नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : लोहा तालुक्यातील जोमेगाव येथे स्वच्छतेची शिकवण देऊन किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे थोर संत मानवतेचे खरे परोपकारी, सामाजिक समरसतेचं मूर्त स्वरूप संत गाडगे महाराज यांच्या स्मृतिदिना निमित्त ग्रामस्थांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.प्रारंभी जोमेगाव ग्रामपंचायत येथे उपस्थित ग्रामस्थांच्या वतीने संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भास्कर पाटील जोमेगावकर ग्रामपंचायत सदस्य पंडित कापसे,मनोहर भुरे ,हणमंत शिंदे तंटामुक्तीचे अध्यक्ष मारोती शिंदे,कोंडीबा गव्हाणे,बाळु शिंदे,देवराव शिंदे नारायण शिंदे शिवाजी माळेगावे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.*

## जसा विचार तसा जीवनाला आकार - सौ.सुनीता गायकवाड



*खर्डा ( प्रतिनिधी )देशाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे अध्यक्ष पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने श्री छत्रपती शिक्षण संकुलात जीवनविद्या मिशन आयोजित 'तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. याप्रसंगी सौ. सुनीता गायकवाड (मुंबई) यांनी वरील उद्गार काढले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी, शिक्षण म्हणजे काय?अभ्यास म्हणजे काय? योग्य संगत, विचार कसे आत्मसात करायचे आणि त्याप्रमाणे जीवन कसे घडवायचे तसेच शिक्षण, ज्ञान,अभ्यास आणि प्रयत्नांचे महत्त्व याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा. प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे, प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य प्रा. चंद्रकिशोर बारटक्के होत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवानंद जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांचे मार्गदर्शन लाभले.*

# कल्याण येथील मराठी कुटुंबावर झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात पोलिसांनी कडक कारवाई सुरू केली

## मुख्य आरोपी अखिलेश शुक्ला याला अटक करण्यात आली असून, यापूर्वी दोन इतर आरोपींनाही अटक करण्यात आली आहे



कल्याण येथील मराठी कुटुंबावर मारहाण प्रकरणी पोलिसांकडून आता कडक कारवाई केली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी मुख्य आरोपी अखिलेश शुक्ला याला अटक केली आहे. त्याला अटक करण्याआधी दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत काय–काय कारवाई करण्यात आली? याबाबत पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी अ टू न माहिती दिली. ङ्गया प्रकरणात खडकपाडा पोलिसांना गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अखिलेश शुक्ला याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. त्याची सध्या अटकेची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे. आरोपीने तासाभरापूर्वी एक व्हिडीओ जारी केला आहे. या व्हिडीओची आम्ही पडताळणी करत आहोत. सदर आरोपी हा टिटवाळा आणि शहाड परिसरात असल्याची माहिती आम्हाला मिळाली होती. त्यानुसार त्याला तिथून ताब्यात घेण्यात आलं आहे. आता आरोपीचं मेडिकल करुन त्याला अटक करण्याची प्रक्रिया सुरु आहेङ्घ, अशी माहिती पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली.

इतर आरोपींना अटक करण्याबाबतही आमच्या टीमचं काम सुरु आहे. बाकीचे उरलेले आरोप

### आरोपीला पकडलं की त्याचं आत्मसमर्पण?

आमची चार पथकं या प्रकरणात कालपासून काम करत आहेत. या प्रकरणी आपल्याला आज सकाळी दोन आरोपी मिळाले. त्यानंतर आता मुख्य आरोपी मिळाला. अखिलेश शुक्ला याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याने व्हिडीओ जारी केला असला तरी त्याला टिटवाळा आणि शहाडमधून आमच्या पथकाने अटक केली आहे अशी माहिती त्यांनी दिली.

आणि त्यांच्या साथीदारांना आम्ही लवकरात लवकर अटक करु. या प्रकरणात एकूण आठ ते दहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. त्यापैकी आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली

### हल्ला करणारे आरोपी रेकॉर्डवरचे गुन्हेगार?

सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारे टोळके हे कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत का, ते अद्याप समजू शकलेलं नाही. आम्ही त्यांची चौकशी करत आहोत. आरोपींचा पूर्व इतिहास घेण्याबाबतची माहिती घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. मुख्य आरोपी अखिलेश शुक्ला वगळता इतर दोन आरोपींवर एमएसपी पोलीस ठाण्यात काही गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळत आहे. त्यांचे जुने गुन्हे आणि आताचा गुन्हा या अनुषंगाने आम्ही कडक कारवाई करत आहोत. शुक्ला यांचा रेकॉर्ड आम्ही चेक करत आहोतङ्घ, अशी महत्त्वाची प्रतिक्रिया पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली.

# संपादकीय

## मंत्रिमंडळाचा पॅटर्न अन नवी समीकरणे

ब–याच प्रतीक्षेनंतर राज्याचे मंत्रिमंडळ आकाराला आले. वरवर पाहता भाजपने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक हाती सत्ता दिल्याचे दिसून येते. मात्र मंत्रिमंडळात त्यांच्या निकटवर्ती यांचा देखील समावेश झालेला दिसत नाही. त्यामुळे फडणवीस यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी दिल्लीतील नेत्यांनी नवीचा खेळली का? असा देखील प्रश्न निर्माण होतो. कारण सुधीर मुनगंटीवार, छगन भुजबळ, संजय कुटे, विजयकुमार गावीत, रवींद्र चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील आदी नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळेल, असे सर्वांनाच वाटत होते, मात्र यादी जाहीर झाल्यानंतर धक्का बसला. यापैकी एकाही नेत्याचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. मोठ्या संख्येने महायुतीच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या लिंगायत समाजालाही मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्चस्वाला दिल्लीने लगाम लावला आणि संतुलन बिघडले, अनेक जिल्हे मंत्रिपदापासून वंचित राहिले. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर बहुप्रतिक्षित असा मंत्रिमंडळ विस्तार अखेर झाला आहे. विस्तार करताना कोणते निकष लावण्यात आले किंवा कोणते लॉजिक वापरण्यात आले, असा प्रश्न उपस्थित होण्याचे कारण म्हणजे मंत्रिमंडळात १६ जिल्ह्यांना न मिळालेले प्रतिनिधित्व ! एकीकडे १६ जिल्ह्यांतून एकही मंत्री नाही आणि दुसरीकडे एकाच जिल्ह्यातून चार मंत्री, एकाच जिल्ह्यातून तीन मंत्री आणि बीडसारख्या अत्यंत संवेदनशील मानल्या जाणा–या जिल्ह्यातून एकाच घरातून दोन मंत्री! सातारा जिल्ह्याला चार मंत्रिपदे मिळाली आहेत. पुणे, जळगाव, नाशिक, यवतमाळ या जिल्ह्यांना प्रत्येकी ३ मंत्रिपदे मिळाली आहेत. भाजपच्या आणि काही प्रमाणात मित्रपक्षांच्या यादीवरही फडणवीस यांचे वर्चस्व दिसून येत आहे. असे असले तरी त्यांच्या काही निकटवर्तीयांना मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही. त्यात संजय कुटे, राणाजगजितसिंह पाटील, विजयकुमार देशमुख आदींचा समावेश आहे. गोपीचंद पडळकर यांना डावलणे म्हणजे वाचाळ, मर्यादा सोडून बोलणा–यांना स्थान मिळणार नाही, असा संदेश देण्यात आला असेही म्हणता येणार नाही, कारण तिकडे नितेश राणे, जयकुमार गोरे यांच्यासारख्या आमदारांना मंत्रिपदे देण्यात आली आहेत. छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार, रवींद्र चव्हाण आदी दिग्गज नेत्यांना डावलणे आश्चर्यकारक आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिपद मिळाले आहे. प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण, सुधीर मुनगंटीवार यांच्या नावांचा विचार होऊ शकतो. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या नावाचीही चर्चा आहे. तीनपैकी कुणातरी एकाची प्रदेशाध्यपदी वर्णी लागेल. अन्य दोन दिग्गज नेत्यांचे काय ? सुधीर मुनगंटीवार हे ज्येष्ठ नेते आहेत. रवींद्र चव्हाण यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी चर्चेत आले होते. यावरूनच बरेच काही लक्षात येण्यासारखे आहे. छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश न होणे धक्कादायक मानले जात आहे. राज्यातील माळी समाज भुजबळ यांनाच आपला नेता मानतो. ओबीसी समाजही मोठ्या प्रमाणात भुजबळ यांना नेता मानतो. भुजबळ यांनी ओबीसी आरक्षण टिकवण्याच्या बाबतीत उघड भूमिका घेतली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यास आपला विरोध नाही, मात्र त्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यास त्यांचा ठाम विरोध आहे. त्यामुळे भुजबळ आणि मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यात सातत्याने खटके उडाले आहेत. मराठवाड्याला सहा मंत्रिपदे मिळाली आहेत. त्यापैकी मराठा समाजाला अहमदपूरचे (जि. लातूर) आमदार बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि जिंतूरच्या (जि. परभणी) आमदार मेघना बोर्डीकर (भाजप) यांच्या रूपाने दोन मंत्री मिळाले आहेत. बीड जिल्ह्याला दोन मंत्रिपदे मिळाली आहेत, पक्ष वेगळे असले तरी ती एकाच घरात देण्यात आली आहेत, धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे. धाराशिव, नांदेडसारख्या जिल्ह्यांना एकही मंत्रिपद मिळालेले नाही. मराठा आरक्षण आंदोलनाच्या केंद्रस्थानी असलेला जालना जिल्हाही मंत्रिपदापासून वंचित राहिला. मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याचीही झोळी रिकामीच राहिली. राज्यात १६ जिल्ह्यांना मंत्रिपदे मिळालेली नाहीत, त्यातील चार जिल्हे एकट्या मराठवाड्यातील आहेत. काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील एका सरपंचाचा खून करण्यात आला. त्यामुळे त्या जिल्ह्यातील एका नेत्याला मंत्रिपद देऊ नये, अशी मागणी संभाजीराजे छत्रपती यांनी केली होती. मात्र पंकजा मुंडे यांच्यासह धनंजय मुंडे यांनाही मंत्रिपद मिळाले आहे. आशिष शेलार यांना मंत्रिपद मिळाले, मात्र त्यांच्या नावावर अखेरच्या क्षणी शिक्कामोर्तब झाले, असे सांगितले जात आहे. मंत्र्यांच्या निवडीत फडणवीस यांचे वर्चस्व दिसत असले तरी, ते वर्चस्व निर्विवाद राहू नये, याची काळजी पंकजा मुंडे, आशिष शेलार यांचा समावेश करून दिल्लीने घेतल्याचे दिसत आहे. सुधीर मुनंगटीवार, रवींद्र चव्हाण यांच्यासारखे अनुभवी चेहरे मंत्रिमंडळात नसल्यामुळे भाजपची अडचण होणार का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. बीड जिल्ह्यात एकाच घरात दोन मंत्रिपदे देऊन फडणवीस आणि दिल्लीनेही संदेश दिल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळात समावेश न झाल्यामुळे अनेकजण नाराज झाले आहेत. भुजबळ यांची नाराजी उघडपणे दिसत आहे. एका जिल्ह्याला चार मंत्रिपदे आणि अनेक जिल्ह्यांना एकही मंत्रिपद नाही, अशी स्थिती का निर्माण झाली, असा प्रश्न आहे. सोलापूरसारख्या जिल्ह्यालाही एकही मंत्रिपद मिळालेले नाही. निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर मुख्यमंत्री कोण हे ठरवायला १२ दिवस लागले. त्यानंतर मंत्र्यांची नावे निश्चित करण्यासाठी आणखी काही दिवस लागले. इतका वेळ घेऊनही घडी विस्कळीतच दिसत आहे. फडणवीस यांना एक हाती सत्ता दिली, ती फडणवीस यांच्यावर दिल्लीतील नेत्यांनी अंकुश ठेवण्यासाठी नवीन चाल खेळली? याबाबत संभ्रम आहे. मंत्रिमंडळातील असंतुलनाचा परिणाम काय होणार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत फायदा होणार की तोटा ? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# उज्जैनकर फाउंडेशन झूम मीटिंगद्वारे डॉ. निशिकांत धुमाळ यांचे, पालक आणि पाल्यांचे नाते व्याख्यान संपन्न

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगावची झूम मीटिंग संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली

त्यानंतर फाउंडेशनचे राज्य संघटक पुणे येथील डॉ. निशिकांत धुमाळ यांनी पालक आणि पाल्यांचे नाते कसे असावे याविषयी ग्रेट भेट क्रमांक ७ या सदरात उत्कृष्ट व्याख्यान दिले.



डॉ.निशिकांत धुमाळ म्हणाले की, पालक आणि पाल्यांचे नाते हे मित्रत्वाचे असावे, मार्गदर्शकाचे असावे कारण वयाच्या ६ ते ११ या वयामध्ये मुलांची ग्रास्पिग पॉवर ही जास्त असते त्यासाठी या वयात त्यांची चेष्टा, मस्करी व अस्लील कृत्य करू नये त्यांचे गुरु शिष्याचे नाते असावे चुकीचे वर्तन करू नये ते पालकांनी जपावे पाल्य सुद्धा गैरफायदा घेण्याची शक्यता असते गर्भवती स्त्रियांवरती संस्कार होणे काळाची गरज आहे त्यांना ऑडिओ व्हिज्युअल एड्स पेक्षा प्रत्यक्ष मार्गदर्शनाची आवश्यकता असते मुलांना लहानपणीस अंधाराची भीती दाखवू नये त्यांना काही वेळेस त्यांचे मनासारखे होऊ द्यावे कारण त्यांच्यामध्ये आत्म शक्ती निर्भयता या गुणांची वाढ कमी वयातच व्हायला हवी कारण काटे आणि गुलाब हे जशी एकत्र असतात तसेच काटे म्हणजे पाल्य आणि गुलाब म्हणजे पालक त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे आईची ममता आणि बाबांची क्षमता कुणी पाहू शकत नाही हे नातं गुलाबाच्या फुलासारखं सदैव उमलत राहावं संस्कार ऐकण्यापेक्षा बोलण्याने व मार्गदर्शनाने जास्त होतात १२ ते १६ हा वयोगट युवा असतो नवीन नवीन शिकण्याचे ज्ञान कला तो आत्मसात करत असतो त्यासाठी त्याला वाव द्यावा चांगले पुस्तक आणून वाचण्यासाठी त्याला द्यावेत प्रथम आई–वडिलांनी पुस्तक वाचावीत नंतरच त्याचे अनुकरण करत असतात तासंतास मोबाईल बघण्याने मुलं सुद्धा त्याच पद्धतीने वागतात जेव्हा आपण त्याला म्हणतो मोबाईल बंद कर तेव्हा ते आपल्याला प्रत्युत्तर देतात डॉ. शशिकांत पुढे म्हणाले की, शिकवणीला माझा तात्विक विरोध आहे मग शाळा, महाविद्यालय काय उपयोगाची आहेत शाळेत जाण्याची गरजच काय विद्यार्थ्यांची,पाल्यांची सुद्धा मतं विचारात घेतली पाहिजेत व त्यांना योग्य समज वेळोवेळी दिली पाहिजे काढलेले आहेत ते प्राथमिक शाळेत जाऊन शिकलेले आहेत काही पालक अशिक्षित आहेत म्हणून काही पाल्य त्यांचा गैरफायदा घेण्याची शक्यता असते परंतु कमी शिक्षण असलेले पाल्य शेतीच्या मेहनती मधून आपल्या पाल्यांना चांगल्या शाळा महाविद्यालयामध्ये टाकण्याचा अट्टहास करतात परंतु पाल्यांना ते पचनी पडत नाही पाल्यांच्या विचारानुसारच शाळा ,कॉलेज मध्ये प्रवेश घ्यावा त्यांच्यावर आग्रह किंवा दडपण करू नये कमी मार्क मिळाले तर त्याला हे नाव नाही शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांचा बहुअंगी विकास व्हायला पाहिजे असे स्वामी विवेकानंद म्हणतात पालकाची भूमिका ही नेहमीच सतर्कतेची असावी पालकांनी कुटुंबाला सुद्धा वेळ द्यावा मनाने जवळ यावे आपल्या पालकांना उत्तम विचारांसह धन द्यावे तेव्हा आपली मुलं आदर करायला शिकतात केली किंवा करत असतील तर ते पाहून आपले पाल्य सुद्धा आपली सेवा व वृद्धांचे व ज्येष्ठांची सेवा नक्की करणार हा निसर्गाचा नियम आहे असे डॉ. निशीकांत धुमाळ म्हणाले की, ऑडिओ, व्हिडिओ ची संस्कार हे क्षणिक आहेत परंतु गुरुच्या माध्यमातून होणारे संस्कार हे चिरकाल टिकणारे आहेत कल्याण वरती पालकांनी तू शिक्षक असावे प्राध्यापकच व्हावे वकील इंजिनिअर व्हावे डॉक्टर्स व्हावे अशा प्रकारचं ओझं लागू नये आणि शिक्षकाच्या मुलाने शिक्षक असावे वकिलाचे मुलांनी वकीलच व्हावे डॉक्टरच्या मुलांनी डॉक्टर व्हावे असे न करता त्या मुलाचा पाल्याचा जो विकास आहे त्याच्या बुद्धिमत्तेनुसार त्याला त्याचे क्षेत्र निवडू द्यावे डॉ. धुमाळ यांनी भगवद्गीता यातील कृष्ण आणि अर्जुनाचा जो संदेश आहे तो अत्यंत मोलाचा आहे मुलांना आध्यात्मिक ग्रंथ वाचाव यास सांगावे त्यातून आपल्याला खूप जीवन विद्या प्राप्त होत असते चांगले समुपदेशक व्हावे व आपल्या मुलांना समूहदेशन करून पर्यायाने त्यांचे क्लासेस लावून आपलं ध्येय घटनेचा प्रयत्न करावा स्वामी विवेकानंद म्हणतात, जीवन जगणे ही एक कला आहे लोक कोणते काम करतात त्यापेक्षा ते काय काम करतात हे महत्त्वाचे असते कल्याण मध्ये आदिरिक्त भीती असली पाहिजे आपले कपडे सुद्धा व्यवस्थित असावेत नीटनेटके असावेत पूर्ण अंगावरती आपले कपडे असावेत पाश्चात्त्य संस्कृतीचा आपण स्वीकार करू नये आपली विचारसरणी राहणीमान सुद्धा चांगले असावे विज्ञानामध्ये सांगितलेला आहे की पाल्यासोबत पालकांनी मैत्रीचे नातं जपलं पाहिजे ही जबाबदारी पालकांची आहे या प्रकरणांमध्ये पालकांचीच गुन्हा गुन्हे जास्त आढळतात अध्यात्मिक दृष्टिकोन चांगला असावा विद्यार्थ्यांना मानसिक सभापदेशन मिळवली केले पाहिजे त्यांच्याविषयी दुय्यम भावना नको मुलं वाईट वर्गाकडे वळतात त्याला पालकही बहुतांशी जबाबदार असतात आई आणि वडिलांचा आशीर्वादाशिवाय पाल्य आपली प्रगती करू शकत नाही विषय सुद्धा डॉ. धुमाळ यांनी आपले विचार प्रकट केले. प्रसंगी उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य कार्यकारणी विविध विभागीय कार्यकारणी तसेच विविध जिल्हा पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

# आभासी दुनियेत सावध रहाः!

सायबर गुन्हेगारी लेख क्रमांक:–३

आपण सायबर गुन्हेगारीचा विचार करताना समाज माध्यमांचा गैरवापर हा लक्षात ठेवला पाहिजे. समाज माध्यमांचा वापर करून महिलांना आर्थिक दृष्ट्या फसवले तर जातेच सोबतच अनेक प्रकरणांमध्ये लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनांमध्ये सध्या वाढ होताना आपणास दिसते.

ङ्गवय वेडं असतं असं म्हणतात पण आपण वेड होऊ नयेङ्ग हे महत्त्वाचं इंस्टाग्राम ओळख झाली आणि त्या व्यक्तीने भेटायला बोलावलं म्हणून भेटायला गेले आणि अत्याचार झाला अशा तक्रारी पोलीस ठाण्यामध्ये वारंवार होत आहेत तसेच तोच प्रकार फेसबुकबाबत सांगता येईल हे असं का घडतं याचा सर्वांनीच विचार करावा.

भाजी आणायला गेल्यावर साधी कोथिंबीर जुडी घेताना आपण पारखून घेतो तर असे मित्र जोडताना आपण पडताळणी, खात्री का नाही करून घेत. इंटरनेटची दुनिया ही आभासी




जग आहे त्यात प्रत्येक व्यक्ती खरी माहिती देईलच याची खात्री नाही त्यातही गुन्हेगारी वृत्ती असणारे तर दंडुका खाल्ल्याशिवाय खरं बोलत नाही मग ते या आभासी जगात खरी माहिती देणारच नाही त्यामुळे आपण सतर्क रहाणे हाच चांगला मार्ग आहे.

चित्रपटातलं ते गाणं आठवतच असेल की ङ्गलाख छुपाओ छुप ना सकेगा असली नकली चेहराफ अर्थात मनातले भाव चेह–्यावर उमटल्याशिवाय राहत नाहीत. आभासी जगात तर सारं ङ्गछुपानेफ ची अर्थात लपवायची पूर्ण मुभा आहे. इथं कुणी आधार कार्डच्या आधारे आपलं खातं उघडत नाही त्यामुळे पावला पावलावर फसवणुकीचा



धोका असतो.

वाढती सायबर गुन्हेगारी लक्षात घेऊन आता देशात सायबर गुन्ह्यांची नोंद सुरू झाली आहे सोबतच महाराष्ट्र पोलिसांनी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे देखील प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेले आहे. सायबर गुन्ह्यांचा शोध घेण्याचे विशेष प्रशिक्षण पोलिसांना देत आहे अर्थात हा गुन्हा नोंदवल्यावर आपण सतर्क राहिलो तर गुन्हा घडणार नाही हे महत्त्वाचं.

सायबर गुन्ह्याची वाढ अतिशय धक्कादायक आहे. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात अनेक प्रकरणी पैसे परत मिळविण्यात पोलिसांना यश आले आहे.

सायबर गुन्ह्याची तक्रार आपल्याला सायबर पोलीस ठाण्यात करता येते तसेच राष्ट्रीय सायबर गुन्हा नोंदणी पोर्टलवर देखील आपण घरबसल्या तक्रार नोंदवू शकता https://cyber-crime.gov.in हा त्या पोर्टलचा पत्ता आहे. सायबर गुन्ह्याचा तपास करण्यात मदत होईल अशी अद्ययावत नॅशनल सायबर फॉरेन्सीक लॅब (तपास) दिल्लीत सुरू करण्यात आलेली आहे.

देशपातळीवर जुलै २०२४ पर्यंत ७.५ (साडेसात) लाख तक्रारी प्राप्त झाल्या या सर्वाधिक तक्रारी आर्थिक फसवणुकीच्या होत्या.

आपण लक्षात ठेवा सायबर गुन्हे आपणास १९३० या टोल फ्री क्रमांक वर देखील नोंदवता येतील पण तक्रार करायची वेळच येऊ नये हे उत्तम.

**(प्रशांत विजया अनंत दैठणकर)**

# गौण खनिज विभागातील कर्मचा–यांने पत्रकारांना धमकावणे म्हणजे चोरांच्या उलट्या बोंबा :– डॉ.गणेश ढवळे

बीड:– ( दि.२०) दैनिक वास्तव बीडचे संपादक जितेंद्र सिरसाट यांनी दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी ङ्ग बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाची बोली लावाच! ङ्ग या मथळ्याखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज अनुषंगाने होणारी आर्थिक लुट अनुषंगाने बातमी केल्याने संपादक जितेंद्र सिरसाट यांना जिल्हाधिकारी कार्यालयातुन महिला कर्मचा–यांने फोनवरून वापरलेली एकेरी भाषा व उचलून आणण्यात येईल अशी गर्भित धमकी वजा दमदाटी केल्यामुळे एकंदरीत लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारीतेवर हा हल्ला असुन यांच्या निषेधार्थ आणि संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व बीड तालुकाध्यक्ष शिवशर्मा शेलार, ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी अपर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर आणि जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे. बीड जिल्ह्यातील गौण खनिज तस्करी प्रकरणात यापूर्वीही ङ्ग जिल्हाधिकारी हटवा आणि बालाघाटाच्या हिरव्या डोंगर रांगा वाचवाङ्ग ङ्गजिल्हाधिकारी




यांच्या आदेशाला केराची टोपली ङ्ग आदि लक्ष्यवेधी आंदोलने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेली आहेत परंतु ठोस कारवाई करण्यात आलीच नाही.

बालाघाटाच्या कुशीतील हिरव्यागार डोंगर रांगा पोखरल्या जाताना गौण खनिज विभाग कुंभकर्णी झोपेत

बीड जिल्ह्यातील गौण खनिज तस्करी प्रकरणात गौण खनिज विभागाचे अधिकारी कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत कार्यालयातील गौण खनिज अधिकारी आणि कर्मचारी यांना गौण खनिज तस्करी बाबत निवेदन तसेच आंदोलनानंतर सुद्धा कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असतात. चौकशीच्या नावाखाली प्रकरणे प्रलंबित ठेवतात. संबंधित प्रकरणात विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध होतात. शासनाचा महसूल बुडतो तसेच बीड तालुक्यातील बालाघाटाच्या कुशीतील हिरव्या डोंगर रांगा गौण खनिज तस्करीमुळे नामशेष होत आहेत.बीड जिल्ह्यातील खडी क्रशर अवैध रित्या चालतात. जिल्हाधिकारी यांनी खडीक्रशरची वीजपुरवठा तोडण्याचे आदेश देऊनही वीज पुरवठा खंडित केला जात नाही.याकडे गौण खनिज अधिकारी कठोर कारवाई करण्याचे टाळतात. याप्रकरणी आम्ही यापूर्वीही सतत निवेदने आणि आंदोलने केली आहेत परंतु अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. तेव्हा गौण खनिज विभाग कुंभकर्णी झोपेत असतो का?? असा संतप्त सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २१ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील ट्रेनी शिक्षक सह सर्व प्रशिक्षणार्थींना कायम स्वरूपी रुजू करावे.

बिड प्रतिनिधी लोक इच्छा न्यूज दि.२० महाराष्ट्र राज्य महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवून ट्रेनी शिक्षक, पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, आरोग्य विभाग अश्या अनेक जागेवर शासकीय व संस्थेच्या जागेवर सहा महिने करीता त्यांना काम करण्याची संधी दिली, येत्या दोन महिन्यांत त्यांचा कालावधी संपणार आहे, काम करणा–या प्रशिक्षणार्थी युवक–युवतीचा कालावधी वाढवून त्यांना कायमस्वरूपी आहे त्या जागेवर रूजू करावे अशी मागणी सर्व ट्रेनी शिक्षकांच्या वतीने अलीम सय्यद, नितिन आगम, सोपान संत, गणेश काशीद, महेश काकडे, विकास मगर,राठोड सर यांनी केली.

या संदर्भात नागपूर येथे आमदार अंबादास दानवे, आमदार नितिन राऊत, आमदार रोहित पवार,आमदार कैलास पाटील, आमदार राजू नवघरे, आमदार मोनिकाताई राजले, आमदार मुफ्ती इस्माईल, आमदार प्रवीण स्वामी सह अनेक आमदारांना निवेदनात नमूद केले आहे की, सर्व प्रशिक्षणर्थींना कायमस्वरूपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. त्या अनुषंगाने निवेदनात नियमानुसार काम आणि दरमहा किमान पाच तारखेच्या आत विद्या वेतन द्यावे, युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांना किमान महिन्याचे वेतन २५ हजार वेतन द्यावे. कायम करूनही दप्तर दिरंगाई मुळेच विद्या वेतन मिळत नसेल, तेव्हा दिरंगाई करणा–यावर योग्य कारवाई करावी. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना आहे त्या जागेवर कायमस्वरूपी रुजू करावे अशी मागणी नितिन आगम, अलीम सय्यद, सोपान संत, गणेश काशीद, विकास मगर, राठोड सर यांनी केली.

# विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण शानदार सोहळा संपन्न !!

नुकताच, रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई ( रजि.), शैक्षणिक समिती आयोजित, विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळा, रविवार दि. १५ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, शारदा सिनेमा दादर, मुंबई येथील कार्यक्रमाचे अध्यक्ष व संघ अध्यक्ष श्री मयुर देवळेकर साहेब, प्रमुख पाहुणे श्री श्रीधर मेढेकर – डीन, कूपर रुग्णालय, आणि श्री डॉ. नंदकिशोर चंदन (असो. प्रोफेसर, उप प्राचार्य, एचओडी – डिपार्टमेंट ऑफ केमेस्ट्री – सिद्धार्थ कॉलेज चेअरमन : धएड फॉउंडेशन ऑफ मुंबई ),




शिक्षण समिती अध्यक्ष श्री पंढरी जानवलकर, संघ कोषाध्यक्ष श्री दिंगबर आर्लेकर, संघउपाधक्ष श्री गणेश चव्हाण, संघ चिटणीस श्री.संतोष तुकाराम गोठणकर, संघ चिटणीस श्री सूर्यकांत दाभोलकर, सर्वश्री संघविश्वत रवी पेवेकर, संतोष नेवरेकर, शशिकांत आबेकर, सुनील वायंगणकर आदी उपस्थिती होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला गीतकार विलास देवळेकर लिखित संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्यावरील अंगाई गीत व पर्यावरण गीत सादर, गायक व संगीतकार– एकनाथ धयाळकर यांनी सादर केले. रोहिदास मंचावरील मान्यवरांना शाल व संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक समिती अध्यक्ष यांनी केले. प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थी यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. संघ अध्यक्ष श्री मयुर देवळेकर यांनी विद्यार्थी यांना शुभेच्छा देत असताना, उपस्थित समाज बांधवांना समिती व रोहिदास भवन साठी आर्थिक देणगी, मदत करण्यासाठी आव्हान केले. यावेळी झकऊ प्राप्त सत्कारार्थिती डॉ. सौ. प्राजक्ता म्हप्रोळकर (पी.एच.डी.), व सौ. श्वेता अपूर्व गडकरी (पी.एच.डी.) यांचा ङविशेष सत्कारङ्घ संघ अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच, गायक व संगीतकार– एकनाथ धयाळकर आणि गीतकार विलास देवळेकर ह्या दोघांचा ही एकत्र विशेष सत्कार करण्यात आले.

सर्व उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन समिती चिटणीस श्री सुरेश जालगावकर यांनी सर्वांचे आभार मानले. आणि शेवटी, गीतकार विलास देवळेकर यांच्या राष्ट्र ध्वज गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लाडका विक्रेता सन्मान योजनेची मागणीलॉटरी वाचवा विक्रेता जगवा!

मुंबई(प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर) महाराष्ट्राच्या अर्थचक्रात वर्षभर ग्राहकांना रोख बक्षिसे, विक्रेत्यांना कमिशन सरकारला महसूलातुन विकास कामांसाठी रक्कम मिळवून देणारा लॉटरी उद्योग हा दुर्लक्षित करून चालणार नाही. त्यामुळे गोरगरीब, कष्टकरी यांना आधारच मिळत आहे. उलट यलाडकी बहिणफ योजनेप्रमाणे सरकारने लाडका लॉटरी विक्रेता ही नवीन सन्मान योजना सुरू करण्याची वेळ आली आहे! अशी जोरदार मागणी महाराष्ट्र लॉटरी विक्रेत्यांचे आक्रमक नेते श्री विलास सातार्डेकर यांनी केली आहे! लॉटरी वाचवा विक्रेता जगवा अशी घोषणाही त्यांनी दिली. गेल्या पाच दशकांहुन अधिक काळ महाराष्ट्राच्या अर्थकारणात ग्राहक, विक्रेते आणि सरकार यांच्या अर्थकारणात



महत्त्वाची मोलाची कामगिरी बजावणारी राज्य लॉटरी अखेर बंद करण्याचे प्रयत्न हे प्रशासकीय स्तरावर वेगाने सुरू झाले असून लॉटरी उद्योगावर अवलंबून असणा–या सार्यांनीच सतर्क राहावे असे कळकळीचे आवाहन लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते श्री विलास सातार्डेकर यांनी केले आहे. बदलत्या काळात राज्य लॉटरी समोर अनेक पर्याय हे उभे राहिले आहेत त्याचा परिणाम राज्य लॉटरीच्या विक्रीवर पडणे हे तसे स्वाभाविक आहे परिणामी लॉटरीची विक्री मंदावली आणि प्रशासकीय स्तरावर राज्य लॉटरीच बंद करण्याच्या हालचालींना वेग आला. दुर्दैवाने लॉटरी बंदचा निर्णय हा नव्या सरकारने घेतला तर राज्यभरातील विक्रेते आणि त्यांच्यावर अवलंबून उद्योगधंदे व कुटुंबिय यांच्यावर बेरोजगारीचे संकट अटळ आहे त्यामुळे सर्वानी या संभाव्य निर्णयाविरुद्ध अग्रक्रमाने उभे राहावे तसेच हा कुटील डाव उधळून लावावा असे आवाहन सातार्डेकर यांनी केले आहे.महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विक्रमी विक्रीसाठी विक्रेता संघटना नेहमीच विविध उपक्रम राबविते सर्वाधिक विक्री करणा–या विक्रेत्यासाठी कुपनाद्वारे विविध योजना;बक्षिसांवर बक्षिसे;भेटवस्तू, ईत्यादी कार्यक्रम आजवर हाती घेण्यात आले आहेत, अशी माहिती सातार्डेकर यांनी दिली. राज्यातील हजारो लॉटरी विक्रेते आणि त्यांच्या लाखो कुटुंबियांनी एकजुटीने संघटनेच्या सोबत अग्रक्रमाने उभे राहावे असेही त्यांनी स्पष्ट केले.शिवसेनाप्रमुखांचा इशारा आजही दिशादर्शक १९९७ साली महाराष्ट्र शासनाने लॉटरी बंद करण्याचा डाव रचला होता पण तो डाव हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या एका ईश–यामुळे राज्यशासन आणि न्यायालय यांना मागे घ्यावा लागला महसूलाच्या स्वार्थापेक्षा शासनाने लाखोंच्या उपजीवेकाचा विचार आधी करावा. गरिबांची रोजीरोटी बुडविण्याची अवदसा कुणाला आठवली तेच कळत नाही लॉटरी बंद झाली तर गुन्हेगारी वाढेल असाही जाहीर सज्जड दम शिवसेनाप्रमुखांनी दिला होता तेच पुन्हा एकदा देण्याची वेळ आली आहे असेही ते म्हणाले.

निषेध नोंदवा!

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या बंदीच्या विरोधात आता सर्वानीच राज्याचे अर्थ सचिव, लॉटरी आयुक्त, मुख्यमंत्री यांच्याशी पत्राद्वारे, ईमेल द्वारे संपर्क साधून आपला निषेध नोंदवा असे आवाहन लॉटरी संघटनेतर्फे करण्यात आले आहे. विक्रेते, ग्राहक, वितरक, विक्रेत्यांचे कुटुंबिय या सार्यांनी यासाठी पुढाकार घ्यावा असेही सूचित करण्यात आले.

# आश्वासने पूर्ण होणार; योजना बंद होणार नाहीत

## ..महाराष्ट्र आता थांबणार नाही – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### लाडक्या बहिर्णींचा देय हप्ता अधिवेशनानंतर जमा होणार, शेतक्-यांना वीज बिल नाही

नागपूर, दि. १९ :– राज्यातील शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकाला दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिला. राज्यातील लाडक्या बहिर्णींना त्यांचा देय हप्ता अधिवेशन संपल्यावर देण्यात येईल, अशी ग्वाही देत महाराष्ट्र कालही नंबर एक होता, आजही नंबर एक आहे आणि उद्याही नंबर एकच राहील, महाराष्ट्राशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात १ जुलै २०२२ पासून ३ लाख ४८ हजार ७० कोटींची गुंतवणूक आली असून यामुळे २ लाख १३ हजार २६७ इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात १० मोठ्या प्रकल्पांना मंजूरी दिली असून यामध्ये २ लाख ३९ हजार ११७ कोटींची गुंतवणूक तर ७९ हजार ७२० इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. विदर्भातील ४७ मोठ्या प्रकल्पात १ लाख २३ हजार ९३१ कोटींची गुंतवणूक होऊन ६१ हजार रोजगार निर्मिती, मराठवाड्यात ३८ प्रकल्पात ७४ हजार ६४६ कोटी गुंतवणूक व ४१ हजार ३२५ रोजगार निर्मिती आणि उर्वरित महाराष्ट्रात १३६ प्रकल्पात १ लाख ४९ हजार ४९३ कोटींची गुंतवणूक होऊन १ लाख १० हजार ५८८ रोजगार निर्मिती होत आहे. यामुळे महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना या ठिकाणी देखील उद्योगाचे जाळे विकसित होत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिला. त्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा संविधानानुसार दिला. यामुळे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी निधी मिळणार आहे. तसेच विद्वानांना दोन पुरस्कार मिळणार आहेत. प्राचीन ग्रंथांचा अनुवाद करण्यात येणार आहे. या सर्व प्रयत्नांसह आपण आपली भाषा रूजविणार आहोत. न्यायालयातील निवाडे मराठीत उपलब्ध करण्यास सुरूवात होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी गेल्या अडीच वर्षात १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे २५.२१ लक्ष हेक्टर जमिन सिंचनाखाली येणार आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला असून नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना आणि जलसिंचन प्रकल्प यासाठी उपयुक्त आहे. वैनगंगा–नळगंगा, नारपार–गिरणा, दमणगंगा–वैतरणा–गोदावरी, दमणगंगा–एकदरे असे नदी जोडप्रकल्प मार्गी लावणार असल्याने विकासाला गती मिळणार आहे. राज्यातील शेतक–याचे जीवनमान उंचावण्यासाठी, शेतक–यांच्या पिकाला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नदीजोड प्रकल्प महत्वाचे आहेत. यासाठी राज्य शासनाने जल आराखडा तयार केला आहे. राज्यात बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत असून यामुळे ही शेतक–्यांना फायदा होणार आहे. मेट्रो प्रकल्प गतीमान मुंबई, नागपूर, पुणे या शहरांमध्ये मेट्रोच्या कामाला अधिक गती देण्यात आली आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांचा प्रवास अधिक गतिमान होणार आहे. मुंबईत मेट्रो मार्गिका ३ टप्पा २ चे काम अंतिम टप्प्यात असून बीकेसी ते कुलाबा ही नवीन लाईफ लाईन होणार आहे. १७ लाख प्रवाशी प्रवास करणार आहेत. मे २०२५ पर्यंत ही लाईन खुली होईल. शेतक–्यांकडून वीज बील घेणार नाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प सुरू केले आहेत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट वीज कार्यान्वित झाली. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट वीज कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतक–यांकडून विजेचे बिल घेणार नाही. ९ लाख कृषीपंप आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. मागेल त्याला सौरपंप आम्ही देणार असून ३ महिन्यात जोडणी देऊ असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. २०३० साली राज्यात ५२ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्रोतातील असेल असेही त्यांनी सांगितले. वाढवण बंदर विकासाचे केंद्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले,

# भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी संसदेमध्ये अपशब्द वापरणा–या

### अमित शहा विरोधात बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निदर्शने ..


. बिड दि.२० प्रतिनिधी (लोक इच्छा)आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भारताच्या संसदेत अपशब्द वापरणा–या देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करून आमीत शहाचा जाहीर निषेध करण्यात आला.. शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव




साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी संसदेत अपशब्द वापरल्या मुळे आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने डोक्याला काळ्या फिती बांधून व काळे झेंडे दाखवून केंद्रीय गृहमंत्र्यांचा निषेध असो असा घोषणा देत केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा यांचा निषेध करण्यात आला.भारत देशाच्या पवित्र संसदेमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भाजपचे गृहमंत्री अमित शहा यांनी बेताल वक्तव्य केले त्या वक्तव्याचा बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करतो. या देशांमध्ये व महाराष्ट्रमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कोणी अपशब्द वापरत असतील तर बीड जिल्ह्यातील शिवसेना व राज्यातील शिवसेना कदापी सहन करणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी सांगितले..याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर,उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महुवाले, तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण,जिल्हासंघटक नितिन भैय्या धांडे, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके,आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत,शिरूर तालुकाप्रमुख सोपानकाका मोरे,अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष नय्युम भाई,कामगार नेते रवि आण्णा वाघमारे,महिला आघाडीच्या बीड विधानसभा संघटक मीराताई नवले,उपतालुकाप्रमुख प्रकाश धुताडमल,तालुका संघटक विशाल सोनवणे,युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, शिरूर युवाधिकारी साईनाथ ढाकणे,युवा अधिकारी वडवणी नवनाथ मोरे,युवा अधिकारी आष्टी शिवप्रसाद जाधव,युवासेनेचे उपजिल्हाधिकारी ऋषीराज गिरी,गटप्रमुख रामदास मोहिते,माजी सरपंच सखाराम मोहिते,विनोद गुंड पाटील,दीपक घोडके पाटील,अजय आण्णा गायकवाड,अक्षयजी काळे,भिमराव कुटे,दत्ता सुरवसे,बाबु कुटे,राहुल काळे,यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगायो , श्रावण बाळ योजनांचे अर्ज प्रलंबित ठेवली जाणार नाहीत : बीड येथे बैठकीत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आश्वासन

शुक्रवार दिनांक २० डिसेंबर रोजी बीड मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामकाजांचा आढावा घेण्यात आला . या बैठकीला मंडळातील नगरसेवक , नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी ( ग्राम महसूल अधिकारी ) , कृषी सहायक , बीएलओ , स्वस्त धान्य दुकानदार इत्यादी उपस्थित होते . तसेच नगरसेवक भैय्या बनसोडे , नगरसेवक विशाल घाडगे व शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते . सुरुवातीलाच तहसीलदारांनी सांगितले तुमच्या समस्या तुम्ही बिनधास्तपणे मांडा . आपण सगळ्यांचे प्रश्न जाणून घेऊ व त्यावर उपाय करु सुरुवातीला स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला . एकही पात्र लाभार्थी रेशन मिळण्यापासून वंचित राहू नये , ई केवायसी करताना विलंब लावू नये अशा सक्त सूचना सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना शेळके यांनी दिल्या . अनेक लाभार्थ्यांनी ई केवायसी केलेले नाही . आपापल्या स्वस्त धान्य दुकानदारांकडे जाऊन ते मोफत करुन घ्यावे , असे आवाहन या वेळी तहसीलदारांनी केले . त्यांनतर नगरसेवक भैय्या बनसोडे यांनी स्वस्त धान्य दुकानासंदर्भात व संजय गांधी योजना , श्रावण बाळ योजना संदर्भात काही समस्या मांडल्या . तहसीलदार शेळके यांनी केलेल्या सूचना व समस्या निश्चितपणे सोडवल्या जातील असे आश्वासन दिले . सर्वसामान्य लोकांच्या अडचणी जाणून घेऊन , त्यांची प्रलंबित कामे याबद्दल सविस्तर चर्चा करून त्यावर तात्काळ कार्यवाही करावी , अशा सूचना संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या . नागरिकांनीही आपले प्रश्न शेतासंबंधी असो किंवा वैयक्तिक असो बेधडकपणे मांडले आणि तहसीलदारांनी त्यांचे यथोचित समाधान केले . यातुन त्यांची कार्यतत्परता आणि लोकांविषयी असलेला कनवाळूपणा दिसून आला . बैठकीदरम्यान काही नागरिकांनी मुद्दा उपस्थित केला की शहरी भागात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदार यांच्या लवकर ओळखी होत नाहीत . यावर शेळके यांनी सांगितले की बी एल ओ यांना नगरसेवक , स्थानिक जनता यांच्याशी संपर्क ठेवण्याच्या व मतदान केंद्रावर नियमित जाण्याच्या सुचना दिल्या जातील. पुढे बोलताना तहसीलदार शेळके यांनी सांगितले की शेतक–यांना तुती लागवड , पशुपालन करणे , नेट शेड शेती , फार्मर प्रोडूसर कंपनी स्थापन करणे इत्यादी अनेक जोडधंदे अथवा व्यवसायातून स्वतःची उन्नती साधता येईल . तदनंतर उपस्थित अधिकारी , कर्मचारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला . अधिकारी कर्मचा–यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत तसेच त्यांना सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत , त्यांची सर्व कामे वेळेवर पूर्ण केली पाहिजेत, अशाही सूचना दिल्या . बैठक सुरू असतानाच मंडळातील नागरिकांनी आमच्या प्रलंबित अनुदानाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी केली . तहसीलदारांनाही तात्काळ मंडळाधिकारी , तलाठी यांना सूचना देऊन कोणत्याही नागरिकांची कामे प्रलंबित राहणार नाहीत , याबाबत दक्षता घ्यावी असे सूचित केले . यानंतर उपस्थित असलेले सर्व बीएलओ यांना नवीन नाव नोंदणी , मयत नावे वगळणी , मतदार यादी दुरुस्ती संदर्भात सूचना दिल्या . मतदानस्तरीय अधिकारी ( बी एल ओ ) यांनी मतदान केंद्राबाबत , नाव वगळणी बाबत काही समस्या मांडल्या . त्यालाही तहसीलदारांनी उचित उत्तर दिले . उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी शेतक–यांच्या प्रश्नाविषयी सजग असतात . सर्वांचे प्रश्न जाणून घ्या , असे त्यांचे म्हणणे असते . बैठकीत पुढे बोलताना प्रामुख्याने अनुदानापासून कोणीही पात्र शेतकरी वंचित राहू नये , तसेच सलोखा योजनेचा प्रचार , प्रसार , प्रसिद्धीकरणावर भर द्यावा , असे यावेळी तहसीलदारांनी सांगितले . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले . सर्व ग्राम महसूल अधिकारी यांच्या वतीने बोलताना मंडळ अधिकारी बाबासाहेब तांदळे यांनी आश्वासन दिले की मंडळातील नागरिकांची अथवा शेतक–यांची कोणतीही कामे , रस्त्याची कामे अथवा इतर कामे प्रलंबित राहणार नाहीत याबाबत पूर्णतः दक्षता घेण्यात येईल तहसीलदार शेळके यांनी ग्रामीण भागात स्वतः येऊन शेतक–यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या , याबद्दल सर्वसामान्य जनतेने समाधान व्यक्त केले . यावेळी बीड मंडळाचे मंडळ अधिकारी बाबासाहेब तांदळे , बीड पिंगळे सजेचे ग्राम महसूल अधिकारी शरद




घोडके , बीड बलगुजार सजेचे ग्राम महसूल अधिकारी जे एस राऊत , बीड खोड सजेचे ग्राम महसूल अधिकारी शशांक कुलकर्णी, आहेर धानोरा सजेचे ग्राम महसूल अधिकारी हरिदास काकडे , मंडळातील कृषी सहाय्यक रूपाली पाटकर , व श्री सोनवतीकर इत्यादी उपस्थित होते . यावेळी ग्राम महसूल अधिकारी जगन्नाथ राऊत यांनी ईपीक पाहणी करण्याची प्रक्रिया याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली . यावेळी अधिकची माहिती देताना ग्राम महसूल अधिकारी शरद घोडके यांनी नमूद केले की ई पीक पाहणीच्या कालावधीमध्ये कार्यक्रमांमध्ये वेळापत्रकामध्ये थोडासा बदल करण्यात आलेला आहे . नोव्हेंबर पासून सुरु होणारी ई पीक पाहणी आता एक डिसेंबरपासून सुरू करण्यात आली आहे . एक डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये शेतक–यांना आपल्या रब्बीच्या पिकांची पाहणी करता येणार आहे . त्यानंतर १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये सहाय्यक स्तरावरील ई पीक पाहणी केली जाणार आहे . शेतक–यांच्या माध्यमातून ई पिक पाहणी करत असताना ऊउड ॲपच्या माध्यमातून ई पिक पाहणी केली जाणार आहे . ती करत असताना तंतोतंत जिओ फेन्सिंग च्या माध्यमातून होणार असल्यामुळे शेतक–यांना स्वतःच्या गटांमध्ये उभे राहूनच ई पाहणी करावी लागणार आहे . अशा प्रकारची ई पिक पाहणी केल्यानंतर त्यातील १०% ई पिक पाहणी ही ग्राम महसूल अधिकारी यांच्या माध्यमातून तपासली जाणार आहे . अशा प्रकारच्या कार्यक्रमासह आता रब्बी हंगाम २०२४ ची ई पिक पाहणी १ डिसेंबर २०२४ पासून करण्यात येत आहे . ग्रामीण भागात उद्योगांमधून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात , शेतक–यांनीही अशाप्रकारे छोटे–मोठे उद्योग व्यवसाय सुरू करावे असे आवाहन यावेळी तहसीलदार शेळके यांनी केले . सर्वसामान्य जनतेत मिसळून त्यांच्याशी संवाद साधणारा , त्यांच्या समस्या जाणून घेणारा , सोबतच विविध विभागाचे अधिकारी , कर्मचारी यांना घेऊन फिरणारा तहसीलदार म्हणून चंद्रकांत शेळके यांची ओळख निर्माण होत आहे . अशा प्रकारे जनतेशी थेट संवाद असल्यास निश्चितच त्यांच्या अडचणींचे निराकरण होईल आणि प्रशासन वेगवान होईल यात शंका नसावी .

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर





मा. ना .धनंजयजी मुंडे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल आज नागपुर येथे भेट घेऊन सत्कार करुन शुभेच्छा देताना राष्ट्र वादी कॉँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मा. बबनराव गवते बाप्पु समवेत राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष मा. बाळासाहेब गुजर, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे व्ही. जे. एन. टी. सेलचे जिल्हा उपाध्यक्ष मा. केशव तांदळे आदी उपस्थित होते.

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी पोलीस अधिक्षकांची बदली, शरद पवार आज कुटुंबियांची भेट घेणार

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला आज १३ दिवस पूर्ण होत आहेत.

**बीड,/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. या घटनेने बीड जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघालं आहे. त्यातच आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार हे आज मस्साजोग दौरा करणार आहेत. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची ते भेट घेणार आहेत. तर दुसरीकडे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना वैद्यकीय रजेवर पाठवण्यात आले आहे.



सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला आज १३ दिवस पूर्ण होत आहेत. या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर तीन आरोपी अद्याप फरार आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार आज मस्साजोग दौरा करणार आहेत. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची ते भेट घेणार आहेत. ङ्गआमच्या राजाला न्याय पाहिजेङ्ग अशा आशयाचे बॅनर सध्या मस्साजोगमध्ये झळकताना दिसत आहेत. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणी शरद पवार आता नेमकी काय भूमिका घेणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदलीबीडमधील संतोष देशमुख हत्याप्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे. याप्रकरणी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना सक्तीच्या वैद्यकीय रजेवर पाठवण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्याची घोषणा केली होती. यानंतर अविनाश बारगळ यांना रजेवर पाठवण्यात आले आहे. त्यामुळे अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे पदभार देण्यात आला आहे. सचिन पांडकर यांच्याकडे अतिरिक्त पदभार असणार आहे.

गुन्हेगारांवर कठोर कारवाई करु, देवेंद्र फडणवीसांचे निवदेन

दरम्यान बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या प्रकरणानंतर सर्वच स्तरातून तीव्र पडसाद उमटत आहेत. राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन सध्या नागपूरमध्ये सुरु आहे. या अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षांच्या आमदारांनी या मुद्द्यावरून महायुती सरकारला परखड शब्दांत जाब विचारला. विरोधकांनी सातत्याने यावर राज्य सरकारनं भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधिमंडळात निवेदन सादर करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन सभागृहाला दिलं. तसेच, त्या भागातील पोलीस अधीक्षकांचीही बदली केल्याची माहिती देण्यात आली

# सन्माननीय षंढानों एकांकिका अंतिम फेरीत दाखल

येथील जी. एच. रायसोनी करंडक ही मानाची राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील विविध केंद्रावरून अनेक एकांकिका सादर झाल्या. जळगाव केंद्रावर प्राथमिक फेरीसाठी १४ एकांकिका आल्या होत्या. या एकांकिकेतून अंतिम साठी निवडक एकांकिका निवडण्यात येणार होत्या. जी. एच. रायसोनी नागपूर करंडक साठी जळगाव केंद्रावर श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा येथील सन्माननीय षंढानों ही एकांकिकेचे दमदार सादरीकरण झाले. फिरोज काझी लिखित मसन्माननीय षंढानोंफ ही एकांकिका स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि बलात्कारासारखे प्रकार



उघड्या डोळ्यांनी बघून शांत बसणाऱ्या थंड रक्ताच्या पौरुषत्वला चपराक आहे. या एकांकिकेचे दिग्दर्शन प्रतीक्षा जाधव यांनी केले. आणि मार्गदर्शक प्रा. डॉ. तुकाराम देवकर यांनी केले. या स्पर्धेसाठी प्रा. राजेंद्र देशमुख व नाट्यकर्मी मंजुषा भिडे यांनी या केंद्रासाठी परीक्षण केले. नागपूर येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी निवड झालेल्या या संघाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. विशेष सहकार्य: श्री व्यंकटरावजी कदम साहेब, (अध्यक्ष, रामेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ) श्री योगेश भैय्या (सचिव, रामेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ) मार्गदर्शक: प्राचार्य डॉ. के.के. पाटील महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कलावंतांचे कौतुक केले. या प्रयोगासाठी प्रायोजकत्व पोलीस स्टेशन सिरसाळा, श्री कल्याण क्षीरसागर, राजाभाऊ राठोड,प्रभाकर काळे या लोकांनी स्वीकारले.यातील कलावंत: तरुणी १: सुप्रिया जाधव तरुणी २: प्रतीक्षा जाधव तरुणी ३: वैष्णवी जाधव तरुणी ४: मुक्ता रासवे तरुणी ५: भावना किरवले तरुणी ६: रमा लाडे यातील तांत्रिक कलावंत संगीत : प्रा. डॉ. तुकाराम देवकर प्रकाश योजना: दादा नवघरे नेपथ्य: ज्ञानेश रासवे रंगभूषा: पूजा किरवले वेशभूषा: विशाल सोनवण

# प्रत्येक मराठी माणसाचा योग्य मान-सन्मान ठेवणार- उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, दि. २० : कल्याणच्या योगीधाम सोसायटीत मराठी माणसाला झालेली मारहाण आणि अन्यायाच्या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सांगितले. महाराष्ट्र हा ङ्गशिव-शाहू-फुले आंबेडकरांफ्चा आहे. इथे कुणी मराठी माणसावर अन्याय करत असेल तर ते चालणार नाही. सभागृहात मांडण्यात आलेली माहिती तपासून मराठी माणसावर अन्याय करणारा संबंधित अधिकारी कितीही मोठा असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. महाराष्ट्रातल्या प्रत्येक मराठी माणसाचा ङ्गमान-सन्मानफ राज्यात ठेवला जाईलङ्ग, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत राज्य सरकारची भूमिका मांडली. राज्यातल्या जनतेला आश्वस्त करत, या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात सांगितले.कल्याण येथील योगीधाम सोसायटीत मराठी माणसाला मारहाण आणि अन्यायाची बाब ङ्गपॉईंट ऑफ इन्फॉरमेशनफ्च्या माध्यमातून आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत मांडली. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उत्तर दिले.

# कल्याण प्रकरणाची राज्य शासनाकडून गंभीर दखल

## कुठल्याही परिस्थितीत मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाही- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, दि. २० : कल्याण येथील सोसायटीमध्ये मराठी माणसांवर झालेल्या हल्लूया प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. दोषींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे. मुंबई ही मराठी माणसांची अस्मिता आहे. कुठल्याही परिस्थितीत मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाही असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत केले.कल्याणमधील मराठी कुटुंबावर झालेल्या हल्लूया प्रकरणी विधानपरिषद सदस्य ॲड. अनिल परब यांनी मांडलेल्या विधानपरिषद नियम २८९ अन्वये चर्चेला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उत्तर दिले. या चर्चेत विधानपरिषद सदस्य सर्वश्री ॲड. परब, शशिकांत शिंदे, अरुण उर्फ भाई जगताप, सचिन अहिर यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, कल्याण येथील एका सोसायटीत अखिलेश शुक्ला व त्याच्या पत्नीने भांडणात मराठी माणसाचा अवमान केला. या प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शुक्ला हा ङ्गएमटीडीसीफ्चा कर्मचारी असून त्याला निलंबित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

महाराष्ट्र, मुंबई ही मराठी माणसाची अस्मिता आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी असल्याने येथे देशभरातील विविध समाज, समुदाय येत असतात आणि ते येथे शांततेने राहतात. उत्तर प्रदेशातून आलेले अनेक लोक मराठी भाषा उत्तम बोलतात, अनेक मराठी सण साजरे करतात. मात्र, अशा काही लोकांमुळे या सामाजिक सलोख्याला गालबोट लागते, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, एखाद्याचा आहार कोणत्या पद्धतीचा, प्रकारचा असावा याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे. पण अशा प्रकारे रोखण्याचा कोणालाही अधिकार नाही. या आधारावर भेदभाव मान्य नाही. अशा तक्रारी आल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

देशातील वैविध्य टिकले पाहिजे, ही आपली जबाबदारी आहे. क्षेत्रिय अस्मिता म्हणजेच मराठी असल्याचा आम्हाला अभिमान आहे, त्यावर घाला घातल्यास सहन करणार नाही, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

# साहित्यिका , कवयित्री अनिता प्रविण कळसकर यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार




प्रतिनिधी –ठाणे जिल्हा कल्याण येथील साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्या तसेच नैसर्गिक पर्यावरण संवर्धन आणि मानवता विकास महाराष्ट्र,ठाणे जिल्हा उपाध्यक्षा मा.अनिता प्रविण कळसकर यांना नुकताच प्रेरणा फाऊंडेशन आणि प्रेरणा नाट्यमंडळ बदलापूर , महाराष्ट्र यांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ या पुरस्काराने बल्लाळेश्वर मंगल कार्यालय बदलापूर इथे शाल,पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी प्रेरणा फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. प्रेरणा कुलकर्णी, सचिव श्री.वैभव कुलकर्णी,डॉ.अविनाश म्हात्रे, श्री.राम जित गुप्ता ,ॲड.मोहन शुक्ला ,तसेच मा.लेखा तोरसेकर आणि अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. प्रेरणा फाऊंडेशन ही एक सामाजिक जबाबदारीचे. भान ठेवणारी संस्था असून या संस्थेमार्फत अनेक आदिवासी,गरजू विद्यार्थ्यांना मदत केली जाते.अनेक उपक्रम या संस्थेमार्फत चालवले जातात.या पुरस्कार सोहळ्यात जवळपास १५० स्त्री/पुरूषांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . कार्यक्रम अतिशय थाटात पार पडला. लेखिका आणि कवयित्री असलेल्या तसेच शब्दसुमने साहित्यिक मंचच्या संस्थापिका आणि अध्यक्षा , नैसर्गिक पर्यावरण संवर्धन आणि मानवता विकास महाराष्ट्र ठाणे जिल्हा उपाध्यक्षा मा.अनिताताई प्रविण कळसकर यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संघर्षमय जीवन जगणा-या धनगर समाजाची राजकीय नेतृत्वा कडे यशस्वी वाटचाल सुरु. साहित्यिक भारत कवितके यांचे प्रतिपादन.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.सातत्याने संघर्षमय जीवन जगणा–या धनगर समाजाची आता राजकीय नेतृत्वा कडे यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे असे प्रतिपादन धनगर समाजातील ज्येष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ता भारत कवितके यांनी आपल्या मुंबई येथील एका मुलाखतीत सांगितले.ते पुढे म्हणाले,ङ्ग सध्याचे राजकीय वातावरण पाहता धनगर समाजाला पोषक असेच आहे, धनगर समाजाचे सहा आमदार विधानसभेत निवडून आले,तर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या माहेरचे नववे वंशज प्रा.राम शिंदे हे विधान परिषदेच्या सभापती पदावर विराजमान झाले.ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.तर दत्तात्रय भरणे मामा यांना कॅबिनेट मंत्री झाले,जत विधानसभा मधून चाळीस हजार मतांनी निवडून आलेले समाजाचे वक्तृत्व संपन्न,





नेतृत्व संपन्न, असलेले गोपीचंद पडळकर निवडून आले.समाज गोपीचंद पडळकर यांचे कडे मोठ्या अपेक्षाने पाहतो आहे. सांगोल्यातून डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ही आपल्या बलाढ्य प्रतिस्पर्धी चा पराभव करून आमदार झाले.इंदापूर येथून दत्तात्रय भरणे मामा ही नुकतेच कॅबिनेट मंत्री झाले.माळशिरस चे उत्तमराव जानकर शांत, संयमी व्यक्ती मत्व निवडून आले.फलटण मधून सचीन कांबळे तर करमाळा येथून नारायण आबा पाटील विधानसभेत निवडून आले. कर्जत जामखेड मधून प्रा.राम शिंदे यांचा निसटता पराभव झाला असला तरी विधान परिषदेच्या सभापती पदावर ते बिन विरोध निवडून आले आहेत. पूर्वी धनगर समाजाचे राजकीय नेतृत्व नसल्यामुळे समाजाच्या समस्या विधानसभेत कोण प्रश्न मांडणार? पण आता मात्र समाजाचे सहा वाघ विधानसभेत समाजाच्या विविध प्रश्नांवर डरकाळी फोडल्याशिवाय राहणार नाहीत.समाज या सहा वाघाकडे मोठ्या आशेने पाहत आहे.यांनी समाजाचा आपेक्षा भंग करता कामा नये.समाजाला ७० वर्षांपासून एसटी आरक्षण अमंलबजावणी पासून वंचित ठेवले आहे.संविधान समाविष्ट एसटी आरक्षण अमंलबजावणी झाली नसल्याने धनगर समाजाच्या दोन पिढ्या आरक्षणा विना वंचित राहिल्या.भटकणारा, विखुरलेला, शिक्षित झालेला धनगर समाज आता नक्कीच जागृत झाला आहे.आपल्या आस्तित्वाची त्याला पूर्ण जाणीव झाली आहे.संघर्षाची सवय असणा–या धनगर समाजाला थोडी थोडी राजकीय नेतृत्वाची गोडी लागलेली आहे.भविष्यात येणा–या प्रत्येक निवडणुकीत धनगर समाजाचे आणखी जास्तीत जास्त उमेदवार निवडून येतील व समाजाला न्याय मिळवून देतील अशी माफक अपेक्षा धनगर समाज बांधवांनी ठेवायला हरकत नाही.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com